(०२३४६) चेअरमन २२६२५५ सीईओ २२६६१०

# पलूस सहकारी बॅंक लि; पलूस

प्रधान कार्यालय : ५५५/अ , मेन रोड , पलूस -४१६३१०.

www.palusbank.com

जावक नं ः ५७/ २५२ दिनांक :०७/०६/२०२१

## परिपत्रक क. १५/२०२१-२२

**संदर्भ** ः १) RBI/ २०२१-२२/३२/ DOR.STR.REC.१२/२१.०४.०४८/२०२१-२२
दि ०५/०५/२०२१
२) RBI/ २०२१-२२/३१/ DOR.STR.REC.११/२१.०४.०४८/२०२१-२२
दि ०५/०५/२०२१

**विषय ः कोरोना विषाणू संसर्गामुळे अडचणीत आलेल्या कर्जदारांसाठी कर्जाचे पुर्नगठन धोरण.** २.००
(Resolution Framaework for Covid-१९ - २.०० )

**प्रस्तावना ः**

भारतासह संपूर्ण जगामध्ये कोरोना विषाणूचा प्रादुर्भाव पुन्हा मोठया प्रमाणावर सुरू आहे. महाराष्ट्रात दिनांक १६.०४.२०२१ पासुन अदयाप लॉकडाऊन ( टाळेबंदी ) सुरूच आहे त्यामुळे उद्योग, व्यापार, कारखानदारी, शेती व्यवसायासह सर्वच उदयोगधंदे मोठया प्रमाणात अडचणीत आलेले आहेत. सदर बाबींचा विचार करून रिझर्व बॅंकेने वरिल परिपत्रकाप्रमाणे सर्वच बॅंकाना रिझॉलेशेन फ्रेमवर्क भाग २.०० (Resolution Framaework for Covid-१९ - २.००) सबंधीत मार्गदर्शक सुचना दिलेल्या आहेत त्यानुसार दिनांक ३१.०३.२०२१ रोजी जी कर्ज खाती उत्तम जिंदगी वर्गवारी (standard Asset) मध्ये होती व अशा कर्जदारांवर कोरोना महामारीमुळे संकट आलेले आहे. अशा कर्ज दारांसाठी प्रत्येक बॅंकेने परिपत्रकामधील मार्गदर्शक सुचनेनुसार कर्जदारांसाठी कर्ज पुर्नगठण धोरण तयार करणेविषयी सुचना केलेल्या आहे. त्याप्रमाणे आपल्या बॅंकेच्या दिनांक ३१.०५.२०२१ रोजी झालेल्या मा संचालक मंडळाच्या सभेत कर्ज दारांसाठी कर्ज पुर्नगठन धोरण तयार करण्यात आले असुन त्यास Resolution Framework For covid १९ -२.०० अंतर्गत पुर्नगठन कर्जधोरण असे संबोधण्यात येईल रिझर्व बॅंकेच्या मार्गदर्शक सूचनेप्रमाणे सदर धोरण खालीलप्रमाणे

**१ कर्ज पुर्नगठन धोरण ठरविणेचा उददेश ः**

सदर धोरणाचा मुख्य उददेश हा बॅंकेकडील ज्या कर्जदारांची कर्ज खाती ही दिनांक ३१.०३.२०२१ रोजी उत्तम जिंदगी (standard Asset) म्हणुन वर्गीकृत आहेत अशा कर्जदारांना त्यांची कर्जखाती पुर्नगठित करण्याची सुविधा / संधी देऊन त्यांचवरील कोरोना विषाणुमुळे निर्माण झालेल्या आर्थिक ताण / अडचण कमी करणेस मदत / सहाय्य करणे असा आहे.

**२) Micro , Small & Medium Enterprises ( MSME ) सेक्टरमधील कर्जे ः**

सध्याचे कोरोना विषाणु संसर्गामुळे उदभवलेल्या परिस्थितीत आपल्या बॅंकेमार्फत उदयोग, व्यवसाय, व्यापार ( MSME) साठी कर्ज दिलेल्या कर्जदारांना मदत किंवा सहाय्य करण्यासाठी खालील अटींवर कर्ज पुर्नगठित करण्याचे धोरण ठरविण्यात आलेले आहे. त्यानुसार सध्या ( MSME ) वर्गीकृत असणारी बॅंकेकडील कर्जखाती डाऊनग्रेड न करता पुर्नबांधणी / पुर्नगठीत करता येतील

१) सदर कर्ज खाते दिनांक ३१.०३.२०२१ रोजी उत्तम जिंदगी (standard Asset) म्हणुन वर्गीकृत असणे आवश्यक राहिल

२) ज्या कर्ज खात्यांचे पुनर्गठण करणेत येणार आहे असे कर्ज खाते Micro , Small & Medium Enterprises वर्गीकृत असणे आवश्यक आहे थोडक्यात कर्ज हे उदयोग, व्यवसाय, व्यापार यासाठी दिलेले असणे आवश्यक राहिल.

३) ज्या कर्जदाराचे बॅंकेकडील फंडेड आणि नॉन फंडेड असे एकत्रित कर्ज दिनांक ३१.०३.२०२१ रोजी रू. २५.०० कोटीपेक्षा कमी आहे अशा कर्जदारांचे कर्ज पुर्नबांधणी पुर्नगठण करणेस पात्र असेल.

४) सदर कर्ज कर्जखात्यांचे पुर्नगठन करताना संबंधित व्यक्ति / फर्मचा G.S.T NO. असणे अनिवार्य राहिल. तथापी सदर अट दिनांक ३१.०३.२०२१ रोजी अस्तित्वात असलेल्या नियमाप्रमाणे GST रजिस्ट्रेशन मधून ज्या व्यवसायांना वगळण्यात आलेल्या आहे अशा कर्जदारांसाठी सदर अट शिथील राहील

५) सदर कर्ज खाते रिझर्व्ह बॅंकेच्या यापुर्वीच्या दिनांक ०६.०८.२०२० रोजीच्या परिपत्रकानुसार पुनर्गठीत केले नसावे.

६) कर्जखात्याची पुर्नबांधणी करणेसाठी कर्जदाराने दि ३०.०९.२०२१ पुर्वी लेखी अर्ज देणे आवश्यक राहिल

७) कर्जदाराने कर्ज पुनर्गठीत करणेची लेखी मागणी केलेनंतर ९० दिवसाचे आत पुनर्गठण करणे आवश्यक राहिल

८) कर्जखात्याचे पुर्नबांधणी करणेपुर्वी उदयोग आधार नोंदणी करणे आवश्यक राहील.

९) पुनर्गठण केलेल्या कर्ज खात्यांच्या येणेबाकीवर १० % तरतुद करणे आवश्यक राहिल

१०) बॅंकेमार्फत वितरित केलेल्या वरील अटी पुर्ण करणाऱ्या MSME कर्जखात्यांना सदर योजनेचा लाभ देता येईल यामध्ये नजरगहाण, व्यवसायिक नजरगहाण कर्ज, औ. नजरगहाण कर्ज, व्यवसायिक वाहन तारण कर्ज, कॅश केडिट कर्ज,स्थावर गहाण CRE , CRE +RH, इत्यादी थोडक्यात MSME मध्ये व्यवसायिक कारणासाठी दिलेल्या सर्व कर्ज खात्यांचा समावेश होईल. कॅश केडिट कर्जप्रकरणी आढावा घेवून लिमिट बदलता येईल. मार्जिन कमी करता येईल इ.

११) वरील शर्ती व अटीशिवाय रिझर्व बॅंकेच्या दिनांक ०६.०८.२०२० व दिनांक ०७.०९.२०२० रोजीचे परिपत्रक व त्यानुसार बॅंकेचे दिनांक २०.१०.२०२० रोजीचे परिपत्रक क. १८/२०२०-२१ मधील निर्देश कायम राहतील.

## ➢ वैयक्तिक कर्ज ( **Personal Loan** )

१) यामध्ये बॅंकेकडून मंजूर करण्यात आलेल्या सर्व प्रकारच्या व्यक्तिगत / वैयक्तिक दिलेल्या कर्जासाठी कर्ज पुर्नगठणाचे धोरण राहील. उदा. रहिवाशी स्थावरगहाण कर्जे, वैयक्तिक वापरासाठी वाहनतारण कर्जे, शैक्षणिक कर्जे,पर्सनल लोन,शेतीपूरक कर्जे इ. सदर धोरण बॅंकेच्या सेवकांना देण्यात आलेल्या कर्जासाठी लागू असणार नाही.

२) Resolation Framework १.०० म्हणजेच यापूर्वीच्या रिझर्व बॅंकेच्या मार्गदर्शक सूचनेप्रमाणे कर्ज खाते पुर्नगठित केले असल्यास अशा कर्जखात्याचे पुन्हा पुर्नगठण करता येणार नाही.

३) दिनांक ३१/०३/२०२१ रोजी उत्तम जिंदगी (Standerd Asset ) म्हणून वर्गीकृत असणाऱ्या कर्ज खात्यांचेच पुर्नगठण करता येईल.

४) कर्ज खातेची पुर्नबांधणी करणेबावत कर्जदाराने दिनांक ३०/०९/२०२१ पूर्वी लेखी मागणी अर्ज देणे आवश्यक राहील.

५) कर्ज खातेची पुर्नबांधणी / पुर्नगठण बावतची अंमलबजावणी कर्जदाराने अर्ज दिलेपासून ९० दिवसांचे आत करणे बंधनकारक राहील.

६) पुर्नगठित कर्जाचे येणेबाकीवर १०% दराने तरतूद करणे आवश्यक राहील.

वरील प्रमाणे MSME व वैयक्तिक कर्जाचे पुनर्गठण करणेसाठी बॅकेस कर्जाचे परतफेडीचा कालावधी वाढवण्यास परवानगी देता येईल सदर कालावधी मोरोटोरियम शिवाय किंवा मोरोटोरियमसह दोन वर्षापेक्षा जास्त दिला जाणार नाही. मोरोटोरियम कालावधी सदर योजनेच्या अंमलबजावणीपासुन सुरू होईल.

सदर धोरणानुसार कर्जदार यांचे खातेस मुदतवाढ देणे, परतफेडीस मोरोटोरियन देणे, मुदत व व्याजाचे परतफेडीचे नवीन हप्ते बांधुन देणे, आवश्यक असेल तर उत्पन्नाचा विचार करून अधिकचे कर्ज मंजुर करणे यासारख्या बाबींचा समावेश असेल प्रत्येक कर्जदाराची मागणी नुसार छाननी करण्यात येऊन त्यास मा संचालक मंडळ मध्ये मंजुरी घेणेत यावी.

रिझर्व बॅंकेच्या सुधारित सुचनेनुसार सदर धोरण ठरविले असून सदर धोरणात नमूद केलेल्या सूचना व्यतिरिक्त रिझर्व बॅंकेच्या दिनांक ०६.०८.२०२० व दिनांक ०७.०९.२०२० रोजीचे परिपत्रक व त्यानुसार बॅंकेचे दिनांक २०.१०.२०२० रोजीचे परिपत्रक क्र. १८/२०२०-२१ मधील निर्देश कायम राहतील.

सदर कर्ज पुर्नगठण धोरणाची काटेकोरपणे अंमलबजावणी करावी.

कळावे

आपला विश्वासू

मुख्य कार्यकारी अधिकारी

प्रत माहितीसाठी,

उपव्यवस्थापक : पलूस विभाग / सांगली विभाग

ऑडीट विभाग / माहिती व तंत्रज्ञान विभाग

शाखाधिकारी : सर्व शाखा